दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ३४६
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, रविवार, दि.२७ जुलै २०२५

**आजचा सुविचार**

ज्यांनी कधी चुका केल्या नसतील
त्यांनी कधी नवीन गोष्टी करण्याचा
प्रयत्न केलाच नसेल....

– अल्बर्ट आइंस्टाइन

# मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवर थरारक अपघात !

## ट्रेलरच्या लरच्या धडकेत १५ ते २० गाड्या कचाट्यात; १ ठार, अनेकजण जखमी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२६, रायगड :** मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवर थरारक अपघात घडला आहे. महामार्गावरील खोपोलीजवळ जवळपास पंधरा ते वीस गाड्यांचा अपघात झाला आहे. उतारावर ब्रेक फेल झालेल्या एका कंटेनरने या सर्व गाड्यांना जोरदार धडक दिली, असे वृत्त आहे. मुंबई दिशेच्या खोपोली पोलीस ठाण्याच्या हद्दीत नवीन बोगदा पासून फूडमॉल हॉटेल पर्यंत अनेक चारचाकी व मोठ्या गाड्यांना धडक बसली आहे. यामध्ये एक जण ठार झाल्याचे वृत्त आहे. तर अनेकांना दुखापती झाल्या आहेत व वाहनांचे प्रचंड नुकसान झाले आहे.



वृत्तानुसार, मुंबई पुणे एक्सप्रेसवेवर आज दुपारी एका ट्रेलरचा ब्रेक फेल झाला. त्यामुळे ट्रेलरची १५ ते २० गाडयांना जोरदार धडक बसली. यामुळे भीषण अपघात घडला. यात एका महिलेचा मृत्यू झाला आहे. मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवरून कंटेनर पुण्याहून मुंबईकडे जाताना तो बोरघाटात आला असता त्याचे ब्रेक फेल झाले. ज्यामुळे कार, बस, ट्रक यांना धडक बसून थरारक अपघात घडला.

धक्कादायक म्हणजे, ट्रक चालक हा बेफानपणे समोर येईल त्या गाडीला धडक देत वेगात जात होता. घटनेची माहिती मिळताच बोरघाट वाहतूक पोलीस महामार्गावर दाखल झाले. त्यांनी अत्यंत शिताफीने ट्रक चालकाला पकडले आहे. या अपघाताची माहिती मिळताच खोपोली पोलीस, बोरघाट पोलीस, आयआरबी टीमने तात्काळ घटनास्थळी दाखल होत अपघातग्रस्त गाड्यांमध्ये अडकलेल्या प्रवाशांना बाहेर काढले. जखमींना पुढील उपचारासाठी एमजीएम रुग्णालयात तर काहींना खोपोली नगरपालिकेच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेचा पुढील तपास खोपोली पोलीस करीत आहेत.

दरम्यान, मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेवरील अपघातांचे सत्र सुरुच आहे. काहीच दिवसांपूर्वी खंडाळा घाटात एसटी बस चालकाचे नियंत्रण सुटल्याने भीषण अपघात घडला होता. कंटेनरला बसची मागून धडक बसल्याने भीषण अपघात घडला. बारामतीहून मुंबईला निघालेल्या बसला कुणे पुलाजवळ हा अपघात झाला. यामध्ये बस चालकाचा जागीच मृत्यू झाला. तर बसमधी ९ प्रवासी जखमी झाले होते आणि तिघांची प्रकृती गंभीर होती.

# हुमणी अळी नियंत्रणासाठी प्रशासन सज्ज !

## शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी – पालकमंत्री मकरंद पाटील



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२६, बुलडाणा :** जिल्ह्यातील सोयाबीन व मका पिकांवर हुमणी अळीचा प्रादुर्भाव झाल्यामुळे शेतकरी अडचणीत आले असले तरी, या संकटावर मात करण्यासाठी शासन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याची ग्वाही राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांनी दिली आहे. प्राथमिक अहवालानुसार जिल्ह्यात ३१३ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले असून, कृषी विभाग व जिल्हा प्रशासनाकडून युद्धपातळीवर उपाययोजना सुरू आहेत. बाधित क्षेत्रातील पंचनामे जलदगतीने सुरू असून, शेतकऱ्यांना लवकरच मदत मिळवून दिली जाईल, असेही पालकमंत्र्यांनी स्पष्ट केले. हुमणी अळीच्या नियंत्रणासाठी कृषी विभाग, कृषी विज्ञान केंद्रे, शास्त्रज्ञ व तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली व्यापक जनजागृती मोहीम राबवण्यात येत आहे. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांनी २४ जुलै रोजी प्रसारित केलेल्या तांत्रिक बुलेटिननुसार, अळीच्या जीवनचक्रावर आधारित एकात्मिक व्यवस्थापनाची अंमलबजावणी करण्याचे आवाहन जिल्हा कृषी अधीक्षक मनोज ढगे यांनी केले आहे.

**हुमणी अळी नियंत्रणासाठी उपाययोजना :** हुमणी अळी ओळखणे : हुमणी अळी इंग्रजी ‘C’ अक्षराच्या आकाराची असून, पूर्ण वाढ झाल्यावर ती तीन ते पाच सेंटीमीटर रुंद आणि पांढुरक्या रंगाची असते. ही अळी सोयाबीन, कपाशी, तूर, ज्वारी, मूग, ऊस, सूर्यफूल, मिरची आणि वांगी यांसारख्या पिकांच्या मुळांवर उपजीविका करते. यामुळे पिके कमकुवत होऊन जमिनीवर कोलमडतात. पिकांमध्ये हुमणी अळीचा प्रादुर्भाव ओळखण्यासाठी, बाधित झाडांची पाने पिवळी पडून सुकतात.

**सौम्य प्रादुर्भावासाठी जैविक नियंत्रण :** जर शेतात हुमणी अळीचा सौम्य किंवा तुरळक प्रादुर्भाव आढळल्यास, ‘मेटारायझियम’ (Metarizhium) या जैविक कीटकनाशकाचा वापर करावा. ४० मिली ‘मेटारायझियम’ १० लिटर पाण्यात मिसळून पिकांच्या मुळाजवळ टाकावे. तसेच, १ किलो ‘मेटारायझियम’ भुकटी १०० किलो शेणखतात मिसळून प्रति हेक्टर शेतात फेकावी. हे जैविक कीटकनाशक वापरताना शेतात पुरेशी ओल असल्याची खात्री करावी.

**तीव्र प्रादुर्भावासाठी रासायनिक नियंत्रण :** हुमणी अळीचा तीव्र किंवा लक्षणीय प्रादुर्भाव आढळून आल्यास, स्थानिक तज्ज्ञांच्या सल्ल्याने रासायनिक कीटकनाशकांचा सुरक्षित वापर करावा. Fipronil 40% + Imidacloprid 40% या मिश्र दाणेदार कीटकनाशकाचे ५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात द्रावण तयार करून झाडाच्या खोडाजवळ टाकावे. Thiamethoxam 0.9% + Fipronil 2% या मिश्र दाणेदार कीटकनाशकाचा १२ ते १५ किलो प्रति हेक्टर या प्रमाणात जमिनीत ओलावा असताना झाडाच्या खोडाजवळ वापर करावा.

शेतकऱ्यांनो, रसायनांचा वापर करताना लेबलवरील मार्गदर्शक सूचना व प्रमाणाचे काटेकोर पालन करावे. कोणतेही मिश्रण टाळून, तज्ज्ञांच्या सल्ल्याने योग्य उपचार करावेत. शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे. या नैसर्गिक संकटावर मात करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहेत, अशी ग्वाही ना.मकरंद पाटील यांनी यावेळी दिली.

# श्री विठ्ठल कारखान्याचे मिल रोलर आ.अभिजीत पाटील यांच्या हस्ते पुजन

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२५, पंढरपूर :** २५ जुलै रोजी श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना लि., वेणूनगर या कारखान्याचा २०२५-२६ हंगामातील मिल रोलर पूजनाचा कार्यक्रम कारखान्याच्या व्हाईस चेअरमन सौ. प्रेमलता रोगे, संचालक कालिदास साळुंखे, सिताराम गवळी व विठ्ठल रणदिवे, यांचे शुभहस्ते व कारखान्याचे चेअरमन, आमदार अभिजीत (आबा) पाटील यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.



यावेळी बोलताना कारखान्याचे चेअरमन, आमदार अभिजीत आबा पाटील म्हणाले की, सर्व सभासदांनी विद्यमान संचालकावर विश्वास ठेवून कारखान्याची सुत्रे आमच्याकडे सोपविलेली आहेत. तेंव्हापासून ज्या ज्या वेळी आपणास बोलल्याप्रमाणे दिलेली सर्व अभ्यासने पाळलेली असून, यापुढेही आपल्या विश्वातास तडा जावू देणार नाही. आपण पिकविलेल्या ऊसाची संपूर्ण नोंद देवून पुढील हंगामात आपले कारखान्याकडे ऊस गाळपास देवून सहकार्य करावे. मागील सन २०२४-२५ गळीत हंगामामध्ये गळीतास आलेल्या ऊसास प्र.मे.टन रु.२८०३/-याप्रमाणे ऊसाची बिले, तोडणी व वाहतुकदार यांची कमिशनराह सर्व बिले अदा केली आहेत, तसेच सेवानिवृत्त कर्मचारी व मयत कर्मचारी यांचे फायनल पेमेंट ठरल्याप्रमाणे अदा केलेले आहे. कामगारांची उर्वरीत थकीत देणी यावर तोडगा काढून टप्या टप्याने अदा करणेस संचालक मंडळ कटीबद्ध आहे. सभासदांचा अपघात विमा उतरविला असून त्याचा ही फायदा सभासदांचे वारसांना मिळून देत आहोत, आपले कारखान्याचे दुर्दैवाने मयत झालेल्या पाच सभासदांच्या वारसांना विमा क्लेचा प्रत्येकी ५ लाख रुपयेचा चेक या प्रसंगी देणेत आला.

तसेच सन २०२५-२६ गळीत हंगामाचे नियोजन पूर्ण केलेने आहे. ऊस तोडणी वाहतूक ठेकेदारांना पहिला ॲडव्हान्स हप्ता अदा केलेला आहे व दुसरा हप्ता लवकरच अदा करीत आहोत. कारखान्याची ऑफ सिझनमधील दुरुस्ती व देखभालीचे कामे प्रगतीपथावर असून गळीत हंगामामध्ये कोणत्याही प्रकारच्या अडचणी येऊ नयेत या दृष्टीने सर्व खातेप्रमुखांनी कामकाज करुन घ्यावे, अशा सूचना देऊन कारखाना वेळेवर चालू करणेसाठी प्रयत्नशील राहावे, तसेच येत्या २०२५-२६ गळीत हंगामात कमीत कमी १५ लाख ते २० लाख मे.टना पर्यंत गाळप करण्याचा संचालक मंडळाचा मानस असल्याचे ही त्यांनी यात्रसंगी सांगितले.

सदर कार्यक्रम प्रसंगी कारखान्याचे जेष्ठ संचालक दिनकर चव्हाण, सचिन पाटील, तुकाराम मस्के सर, महादेव तळेकर सर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

# धारणगाव खडक येथे आगीचा कहर..

## ३ झोपड्या जळून खाक, लाखोंचे नुकसान...




**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२६, धारणगाव (नाशिक) :**

धारणगाव खडक ता.निफाड येथील अकरावड वस्तीवर मध्यरात्री लागलेल्या भीषण आगीत तीन झोपड्या भस्मसात झाल्या. गोविंद चंद्रभान माळी, भाऊसाहेब विश्वनाथ वाघ, आणि दगुबाई श्रीहरी माळी या आदिवासी कुटुंबांच्या झोपड्यांचे पूर्णतः नुकसान झाले असून, लाखो रुपयांचे संसारोपयोगी साहित्य जळून खाक झाले आहे. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

दि.२३ जुलैच्या रात्री सुमारास सुमारे एक वाजता ही दुर्घटना घडली. अकरावड वस्तीवर अचानक आग भडकली आणि काही क्षणांतच तीनही झोपड्या जळून भस्मसात झाल्या. कुटुंबांनी जिवाच्या आकांताने स्वतःचा जीव वाचवला, मात्र घरात असलेले धान्य, कपडे, भांडी, किराणा, दागदागिने आणि संसाराचा प्रत्येक कोपरा आगीत विरघळून गेला. आग लागण्याचे कारण अद्याप अस्पष्ट असून पो.पा.राहुल सोनवणे, लासलगाव पोलीस स्टेशनचे कर्मचारी सागर आरोटे आणि तलाठी कमलेश पाटील यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला.

या दुर्घटनेमुळे सदर कुटुंबांचे आभाळच कोसळले असून ते आत्ता उघड्यावर राहत आहेत. तातडीने मदतीची गरज असून प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# मुख्याधिकारी तथा प्रशासक शैलेश फडसे वादाच्या भोवऱ्यात ! तात्काळ बदलीची मागणी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२६, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड नगरपरिषदेवर प्रशासकराज येऊन ३ वर्षे पूर्ण झाली आहे. अर्धापूर येथे नगरपंचायतीचे ४ वर्षे पूर्ण करतांना मुख्याधिकारी शैलेश फडसे यांच्यावर राजकीय वरदहस्त असल्यामुळे जवळपास २ वर्षे ते मुदखेड नगर परिषदेचे प्रभारी मुख्याधिकारी म्हणून दुहेरी कारभार सांभाळत आहेत. अर्धापूर नगरपंचायतीत एक वादग्रस्त अधिकारी म्हणून ठसा उमटवलेले शैलेश फडसे यांची बदली काही महिन्यांपूर्वी मुदखेड येथे मुख्याधिकारी प्रशासक म्हणून झाली. मुदखेड नगरपालिकेत ३ वर्षांपासून कारभारात लोकप्रतिनिंधीचा लोकसहभाग नसल्यामुळे एक हाती प्रशासक राज आहे. विविध विकास कामांमध्ये प्रशासकांची मनमानी वाढलीय अशी चर्चा होत असते. मुख्य नगरपरिषदेचे मुख्याधिकारी शैलेश फडसे हे मुख्याधिकारी म्हणून कमी पण राजकीय लोकांचे पीए म्हणून जास्त वेळ देतात.

> माझ्याबद्दल जी तक्रार शासनाकडे दिली आहे. शासनाकडून मला नोटीस आल्यानंतर मला जे काही उत्तर द्यायचे आहे ते शासनाला देईल. अशी प्रतिक्रिया मुख्याधिकारी शैलेश फडसे यांनी दिली.

मुदखेड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक शैलेश फडसे यांच्या कार्यकाळात शहरात विविध विकासकामे निकृष्ट दर्जाहीन होत असून सावळागोंधळ वाढला असल्याच्या कारणांमुळे त्यांची तात्काळ बदली करण्यात यावी, अशी मागणी काँग्रेसचे शहराध्यक्ष तथा माजी नगरसेवक कैलास गोडसे यांनी थेट प्रधान सचिव मंत्रालयात, राज्य निवडणूक आयोगाकडे लेखी केली आहे.

मुदखेड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी शैलेश फडसे हे विशेषत: मूळ नांदेड जिल्ह्यातील रहिवासी असून याच जिल्ह्यांत ४ वर्षांहून अधिक काळ तेही भोकर विधानसभा मतदारसंघात सेवा बजावली आहेत. अर्धापूर नगरपंचायती मध्ये ४ वर्षे मुख्यधिकारी म्हणून कर्तव्य बजावले असून तिथे अनेक योजना अर्धवट अवस्थेत सोडल्यामुळे वादग्रस्त मुख्याधिकारी म्हणून ओळख निर्माण झाल्याची बोलले जाते. गेल्या विधानसभा निवडणुकीत अर्धापूर येथे मतदारांना कोंडून ठेवण्याचा कारभार ही फडसे यांनीच सांभाळला अशी चर्चा आहे.

भोकर विधानसभा मतदारसंघात कोणत्याही स्थानिक निवडणुकीच्या काळात शैलेश फडसे हे राजकीय नेत्यांचे हस्तक बनत असल्यामुळे आगामी मुदखेड नगरपरिषद निवडणुकीत राजकीय षडयंत्र होण्याची शक्यता असून वार्ड रचना, इतर फेरबदल राजकीय नेत्यांच्या मर्जीनुसार होण्याची शक्यता आहे. त्यांची तात्काळ बदली करण्यात यावी अशी मागणी मुदखेड शहर काँग्रेसचे शहराध्यक्ष कैलास गोडसे यांच्या नेतृत्वाखाली तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख बारडकर, मुजीब पठाण, गिरीश कोत्तावार, मोहम्मद गौस नबीसाब, सूर्यकांत चौदंते, सय्यद तोफिक गफुर साब, मोहम्मद इकबाल कुरेशी, ऋषिकेश चौदंते, आकाश सोनटक्के यांनी दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे.

# चंद्रपूर जिल्ह्यातील शाळांच्या स्ट्रक्चरल ऑडीटची मागणी : आ. देवराव भोंगळे

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२६, चंद्रपूर :** राजस्थानमधील झालावाड जिल्ह्यातील पिपलोडी येथील एका प्राथमिक शाळेचे छत कोसळून चार विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याची अत्यंत दुर्दैवी घटना घडली आहे. टाइम्स ऑफ इंडियाने दिलेल्या वृत्तानुसार, या घटनेत ३० ते ४० विद्यार्थी ढिगाऱ्याखाली अडकले असण्याची भीती व्यक्त होत आहे. या घटनेने देशभरात हळहळ व्यक्त होत आहे.

या गंभीर घटनेची दखल घेत राजुराचे आ. देवराव भोंगळे यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व शासकीय तसेच खाजगी शाळांच्या इमारतींचे तातडीने स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची मागणी केली आहे. त्यांनी या संदर्भात चंद्रपूरच्या जिल्हाधिकाऱ्यांना एक पत्र लिहिले आहे. आ. भोंगळे यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे की, चंद्रपूर जिल्हा आदिवासीबहुल असून राज्याच्या टोकावर वसलेला आहे. त्यामुळे, या जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या तसेच खाजगी मालकीच्या सर्व शाळांच्या इमारतींचे, विशेषतः जीर्ण आणि धोकादायक स्थितीत असलेल्या इमारतींचे तातडीने स्ट्रक्चरल ऑडिट करणे अत्यंत आवश्यक आहे. यामुळे संभाव्य धोके ओळखून विद्यार्थ्यांची सुरक्षितता सुनिश्चित करता येईल, असे त्यांनी नमूद केले आहे. भोंगळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांनी या गंभीर विषयावर तातडीने लक्ष घालून योग्य ती कार्यवाही करावी, अशी आशा व्यक्त केली आहे.

या संदर्भात, जिल्हाधिकारी कार्यालयाने आ. देवराव भोंगळे यांनी उपस्थित केलेल्या मुद्याच्या अनुषंगाने तात्काळ नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आमदार महोदयांना आणि जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करण्याचेही सूचित करण्यात आले आहे. राजस्थानमधील घटनेच्या पार्श्वभूमीवर, चंद्रपूर जिल्ह्यातील शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी ही एक महत्त्वाची आणि तातडीची मागणी मानली जात आहे.

# संपादकीय



## वृक्षारोपणाची लोकचळवळ

मराठवाडा हा कमी पावसाचा प्रदेश. त्यात धाराशिव जिल्ह्याचे पर्जन्यमानही कमीच. जिल्ह्यात वनसंपदाही म्हणावी तेवढी नाही. सरकारी मोहिमा, संस्था, संघटना यांच्या पुढाकाराने गेल्या काही वर्षांत जिल्ह्यात अनेक ठिकाणी वृक्षारोपण मोहीम राबविली गेली; पण त्याचे प्रमाण कमीच म्हणावे लागेल.

जिल्हाधिकारी कीर्तीकरण पुजार व जिल्हा प्रशासनाच्या चमूने यंदाच्या पावसाळ्यात काही तरी वेगळे राबविण्याचा निर्णय घेतला. मार्च महिन्यात बैठकांचे सत्र सुरू झाले. त्या दृष्टीने जिल्ह्यातील सर्व तालुके, ग्रामपंचायतींचा आढावा घेतला गेला. जिल्ह्यातील सक्रिय ग्रामपंचायतींची वेगळी यादी काढली. ग्रामसेवक, सरपंचांच्या स्वतंत्र बैठका घेऊन त्यांना वृक्षारोपण मोहिमेची माहिती देऊन त्याचे महत्त्व समजावून सांगितले. जिथे हमखास जलस्रोत आहेत, अशा ठिकाणांचे स्वतंत्र वर्गीकरण केले. जमीन तपासणी, माती तपासणी करून घेतली. वृक्षारोपणाच्या जागा तयार करण्यात आल्या. घनवन पद्धतीने एक गुंठा जमिनीत किती झाडे लावायची याची आखणी केली गेली.


एरवी सरकारी मोहिमेचे नियोजन कशी कसे होते, त्याची अंमलबजावणी, आकडेमोड कशी केली जाते आपल्याला माहिती आहे. या मोहिमेसाठी मात्र सूक्ष्म पद्धतीने नियोजन केले गेले. एप्रिलपासून वृक्षारोपणाची ठिकाणे ठरविली त्या परिसरात बैठका घेण्यात आल्या. मोहिमेत सहभागी होणारे अधिकारी, कर्मचारी, गावकरी, स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींना प्रशिक्षण देऊन मोहीम कशी राबवायची याचे प्रशिक्षण दिले गेले. नुसती झाडे लावून उपयोग नाही, तर त्याचे संगोपन करणे तितकेच महत्त्वाचे आहे, हे जाणून वन विभागाने केलेल्या मदतीला जिल्ह्यातील नागरिकांनी जिल्हा प्रशासनाच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत झाडांची काळजी घेण्याचे आश्वासन दिले. पावसाळ्यात धाराशिव जिल्ह्यात ५० लाख वृक्षलागवडीचे उद्दिष्ट निश्चित केले. त्या अनुषंगाने जिल्हा प्रशासन व लोकसहभागातून 'हरित धाराशिव' अभियान ठरविले गेले. १९ जुलै रोजी एकाच दिवशी १५ लाख झाडे लावण्यात आली. त्यात जिल्ह्यातील धाराशिव, तुळजापूर, उमरगा, लोहारा, भूम, परंडा, वाशी व कळंब या आठ तालुक्यांतील २९४ ठिकाणी (२३४ ग्रामपंचायती, १३ नगरपालिका, नगरपंचायत, सीना कोळेगाव धरण आणि वन विभागाच्या ४५ आरक्षित वृक्षलागवड स्थळे) घन वन लागवड केली गेली.

या मोहिमेला तंत्रज्ञानाची जोड देताना एक पोर्टल तयार केले. प्रत्येक झाडाचा 'क्यू आर' कोड केला. मोहिमेपूर्वी सर्व झाडांना हे कोड लावण्यात आले. वृक्षारोपण मोहिमेची माहिती पोर्टलवर उपलब्ध करून दिली गेली. ज्यामुळे ठरावीक काळात जिल्हाभरात एकाच वेळी किती झाडे लावली, त्याची माहिती अद्ययावत होत होती. एकाच वेळी १५ लाख झाडे लावण्याचा विक्रम जागतिक पातळीवर नोंदवला गेला. मोहिमेसाठी नागरिक, ग्रामपंचायत, नगरपालिका पातळीवर पैसे खर्च करण्यात आले. सरकारच्या तिजोरीतून मदत मागितली गेली नाही. हा उपक्रम केवळ एक दिवसाचा नव्हे तर पर्यावरणीय पुनरुज्जीवनाचा ऐतिहासिक टप्पा म्हटले तर वावगे ठरू नये.

'हरित धाराशिव' अभियानाच्या माध्यमातून जिल्ह्याच्या वनआच्छादनात लक्षणीय वाढ, नवीन शाश्वत पर्यावरणीय अधिवास निर्मिती, प्रत्येक गावात देवराई स्वरूपातील जैवविविधतेचे संवर्धन साधण्यास मदत मिळणार आहे. आता ही झाडे कशी टिकवली जातात हे पहावे लागेल. एकाच दिवशी १५ लाख वृक्षलागवड मोहिमेची दखल मराठवाड्यातील अन्य जिल्ह्यांनीही घेतली आहे. बीड जिल्ह्यात लवकरच ही मोहीम हाती घेतली जाणार आहे. त्यासाठी धाराशिवकर मदतीला असणार आहेत. मराठवाड्यातील उर्वरित जिल्ह्यांत राज्यातही अशा प्रकारचा उपक्रम राबविला गेला, तर निश्चितपणे राज्याचा पर्यावरण समतोल राखण्यास मदत मिळेल. धाराशिवकरांची ही मोहीम अभिनंदनीय व अनुकरणीय आहे.

# डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम : क्षेपणास्त्र प्रणालीचे जनक

भारताच्या क्षेपणास्त्र प्रणालीचे जनक, जेष्ठ शास्त्रज्ञ आणि भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम यांची आज दहावी पुण्यतिथी. १५ ऑक्टोबर १९३१ रोजी तामिळनाडूतील रामेश्वरम येथे त्यांचा जन्म झाला. त्यांचे पूर्ण नाव अबुल पाकिर जैनूलाबदिन अब्दुल कलाम असे होते. अब्दुल कलाम यांचे वडील नावाडी होते. रामेश्वरमला येणाऱ्या यात्रेकरूंना होडीने धनुष्यकोडीला नेण्याआणण्याचे काम ते करीत. अब्दुल कलाम शाळेत असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची असल्याने ते गावात वर्तमानपत्र विकू लागले. त्यांचे बालपण काबाडकष्ट करण्यातच गेले. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर ते उच्च शिक्षणासाठी तिरुचिरापल्ली येथील सेंट जोसेफ कॉलेजमध्ये दाखल झाले. तेथे बीएससी झाल्यानंतर त्यांनी मद्रास इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीत प्रवेश घेतला. प्रवेशासाठी त्यांच्याकडे पैसे नसल्याने त्यांच्या बहिणीने दागिने गहाण ठेवून त्यांना पैसे दिले. या संस्थेतून एरोनॉटिक्सचा डिप्लोमा पूर्ण केल्यानंतर त्यांनी अमेरिकेतील नासा संस्थेत चार महिने एरोस्पेस टेक्नॉलॉजीचे प्रशिक्षण घेतले. भारतात आल्यावर त्यांनी सहा वर्ष डीआरडीओमध्ये शास्त्रज्ञ म्हणून काम केले. १९६३ पासून ते इसरो संस्थेत क्षेपणास्त्र विकासातील एसएलव्ही (सॅटेलाईट लाँचिंग व्हेईकल) संशोधनात भाग घेऊ लागले. पुढे ते या प्रकल्पाचे प्रमुख बनले. इसरोचे तत्कालीन प्रमुख विक्रम साराभाई हे अब्दुल कलाम यांच्या कार्याने प्रभावित झाले.



विक्रम साराभाई व अब्दुल कलाम यांच्यात गुरू शिष्याचे नाते निर्माण झाले. विक्रम साराभाई यांनी भारतात विज्ञान तंत्रज्ञानाची आघाडी डॉ कलाम यांनी सांभाळावी असे वक्तव्य केले होते, ते पुढे कलामांनी सार्थ करून दाखवले. पुढे साराभाई यांचेच नाव दिलेल्या विक्रम साराभाई अवकाश केंद्राचे ते प्रमुख बनले. इंदिरा गांधी पंतप्रधान असताना भारताने क्षेपणास्त्र विकासाचा एकात्मिक कार्यक्रम हाती घेतला. या कार्यक्रमाच्या प्रमुखपदी अब्दुल कलाम यांची नेमणूक करण्यात आली त्यामुळे ते पुन्हा डीआरडीओत दाखल झाले. तिथे स्वदेशी बनावटीचे क्षेपणास्त्र तयार करण्याचे शिवधनुष्य त्यांनी लीलया पेलले. डीआरडीओत देशातील नामवंत शास्त्रज्ञांचा संच त्यांच्याकडे होता. वैयक्तिक कामगिरीपेक्षा सांघिक कामगिरीवर त्यांचा भर असायचा. देशातील उत्तम शास्त्रज्ञांकडून सर्वोत्तम कामगिरी करून घेण्याची कला त्यांच्याकडे होती. क्षेपणास्त्र विकास कार्यातील अग्नी या क्षेपणास्त्राचे यशस्वी प्रेक्षपण केल्यावर त्यांचे जगभर कौतूक झाले. अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना ते पंतप्रधानांचे वैज्ञानिक सल्लागार बनले. पंतप्रधानांचे वैज्ञानिक सल्लागार म्हणून काम करताना देशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने त्यांनी अनेक प्रभावी धोरणांची आखणी केली. त्यांनी पंतप्रधानांचे वैज्ञानिक सल्लागार व डीआरडीओचे प्रसुख म्हणून अर्जुन हा एम. बी. टी (मेन बॅटल टँक) रणगाडा व लाईट कॉबॅट एअरक्राफ्ट (एलसीए) यांच्या निर्मितीत महत्वाची भूमिका पार पाडली. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली १९९८ साली भारताने पोखरण येथे यशस्वी अणूचाचणी केली. विज्ञानाचे परमभोक्ता असणारे अब्दुल कलाम मनाने खूप संवेदनशील व साधे होते. त्यांना रुद्रविना वाजवण्याचा आणि मुलांशी गप्पा मारण्याचा छंद होता. भारत सरकारने पद्मभूषण, पद्मविभूषण व १९९८ साली भारतरत्न हा सर्वोच्च पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला. डॉ कलाम हे अविवाहित व पूर्ण शाकाहारी होते. जगातील सर्वात मोठ्या लोकशाही राष्ट्राच्या राष्ट्रपतीपदी निवड झालेले डॉ अब्दुल कलाम हे तरुणांना सदैव प्रेरणा देणारे व्यक्तिमत्त्व होते.




राष्ट्रपतीपदावर विराजमान झाल्यावर डॉ कलाम यांनी मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्याचे काम केले. मोठी स्वप्ने पाहा आणि त्यासाठी भरपूर कष्ट करा असे ते तरुणांना सांगत. देशातील तरुणांवर त्यांचा खूप विश्वास होता. आपल्या देशातील तरुणांमध्ये खूप ऊर्जा आहे या ऊर्जेचा योग्य वापर केला तर देश महासत्ता बनेल असे ते नेहमी म्हणत. त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. अग्निपंख, इंडिया २०-२०, इग्निटेड माईंडस ही त्यांनी लिहिलेली पुस्तके खूप गाजली. अग्निपंख हे त्यांनी लिहिलेले पुस्तक बेस्ट सेलर ठरले. राष्ट्रपतीपदावरून निवृत्त झाल्यावर डॉ कलाम विविध संस्थांमध्ये जाऊन व्याख्याने देत असत. २७ जुलै २०१५ रोजी तरुणांना व्याख्यान देत असतानाच त्यांचे दुर्दैवी निधन झाले. त्यांच्या अकाली निधनाने भारताच्या वैज्ञानिक क्षेत्रात जी पोकळी निर्माण झाली ती कधीही भरून निघणार नाही.

**डॉ ए.पी. जे अब्दुल कलाम यांना पुण्यतिथी निमित्ताने विनम्र अभिवादन!**

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**मो.९९२२५४६२९५**

## बाजीराव पाटणकर यांचे निधन

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि. २६, पाटण :** केर ता. पाटण येथील जेष्ठ नागरिक कै बाजीराव आकाराम पाटणकर यांचे शनिवार दिनांक १९ जुलै रोजी वयाच्या ९२ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुले, एक विवाहित मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे माजी विकास अधिकारी दिलीपराव पाटणकर यांचे ते पिताश्री होत. ते मनमिळाऊ व प्रेमळ स्वभावाचे होते. दशक्रिया विधी सोमवार दिनांक २८ रोजी सकाळी ९ वाजता केरा -कोयना संगमावर महादेव मंदिर(पाटण) येथील स्मशानभूमीत होणार आहे.

## गांजणी...

अधिकार गाजवणे
सवय अंगात न्यारी
माणसा पेक्षा खुर्ची
रे सत्तास्थाने प्यारी

दुखवले कैक जणां
बोलणे कटूविखारी
कडू तिखट वैखरी
वृत्ती बनली विषारी

शिस्तीचेनावाखाली
सदैव दुजा धुत्कारी
दिमतीले नीत हजर
रे मालमत्तासरकारी

निवृत्त होती जेधवा
मदोन्मत्तअधिकारी
मनोमनआनंदोत्सव
साजरे करे सहकारी

ब्याद टळली एकदा
होतीसकल आभारी
प्रतिक्षा नव्यासरांची
भला नेमावा प्रभारी

कोरडेआगतस्वागत
तो मान ना घरीदारी
सुटला बिचारा हत्ती
सोडूननिघताअंबारी

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

अक्षराज
अचूक ... बातमी

# शिवप्रिय - श्रावणमास

हिंदु दिनदर्शिकेनुसार श्रावणमास हा एक पवित्र महिना म्हणून ओळखल्या जातो. हा महिना भगवान शिवांना सुद्धा अतिशय प्रिय आहे असे म्हणतात.त्याचबरोबर या महिन्याला सणांच्या राजांचा महिना म्हणतात. श्रावण म्हटला कि चहूकडे पाणीच पाणी...! नदी, नाले, डोंगरद-या अगदी तुडुंब भरून वाहतात त्याचबरोबर धबधबे डोंगरमाथ्यावरून खाली कोसळतात तो नयनरम्य सोहळा डोळ्याचे पारणे फेडतो. अशा या श्रावण महिन्यात आपणास बालकवी आठवल्याशिवाय राहत नाहीं. बालकवी म्हणतात श्रावण मासी हर्ष माणसी,हिरवळ दाटे चोहीकडे ! क्षणात येते सरसर शिरवे, क्षणांत फिरुनी ऊन पडे ! अशा या महिन्याची तऱ्हाच वेगळी क्षणात पाऊस अन क्षणात ऊन...!

श्रावण मास हा प्रत्येकाला हवा-हवासा वाटतो. या महिन्याचे इतर गोष्टीबरोबर हिंदुधार्मियांसाठी धार्मिक महत्व सुद्धा आहे. या महिन्यामध्ये सणच सण असतात. हिंदू दिनदर्शिकेनुसार श्रावण हा पाचवा महिना..!या महिन्यात सोमवार कधी चार तर कधी पाच येतात त्यांना श्रावणी सोमवार म्हणतात या दिवशी भगवान शिवशंकराची पूजा केली जाते. या महिन्यामध्ये मांसाहारी लोक मांसाहार वर्ज्य करतात. काहीजण सोमवारी उपवास व्रत करतात. अर्थातच एका ठराविक नियमांचे पालन करतात एक संकल्प करतात. श्रावण सोमवारला भगवान महादेवांना काही धान्य अर्पण करतात त्यांना शिवमूठ म्हणतात. त्यातील क्रमवारी लक्षात घेता तांदूळ, तीळ, मुग, जवस ई.ना शिवामूठ म्हणतात. शिवजींना अर्पण करतात. व मनोभावे प्रार्थना करतात व त्यामुळे जीवनातील संकट दूर होतात असे म्हणतात कि, या महिण्यात भगवान शिवशंकर भक्तांचे संकट निवारण करण्यासाठी प्रत्यक्ष पृथ्वीवर वास्तव्य करतात. अशा या श्रावण महिन्यामध्ये सर्वप्रथम येतो तो सण म्हणजे नागपंचमी. या दिवशी नागाची पूजा करतात. खेड्यापाड्यात अजुनही वारुळाची पूजा करतात. त्याचबरोबर आपल्या घरातील भिंतीवर पाच नागाचे चित्र काढतात व त्याची पूजा करतात. भगवान शिवांनासुद्धा नागदेवता प्रिय आहे. वेगवेगळ्या राज्यानुसार, प्रांतानुसार सण साजरे करण्याची पद्धत वेगवेगळी राहू शकते. त्यांनतर मंगळागौरी पूजन विशेषतः नववधू महिला वर्गासाठी हा सण अतिशय महत्वाचा व आनंद देणारा आहे. श्रावण महिन्यातील प्रत्येक मंगळवारी मंगळागौरी पूजनाचा कार्यक्रम महिला वर्ग अगदी आनंदात साजरा करतात.सर्व महिला भगिनी एकत्र जमतात. छान छांन गाणे म्हणतात. फुगड्या खेळतात विशेषतः सासर व माहेरचे गाणे कि, ज्यामाध्यमातून माहेर व सासरचे गुण गातात. त्याचबरोबर पुढील सण येतो तो नारळीपौर्णिमा...!या दिवशीं समुद्र किनाऱ्यावर वसलेले कोळी बांधव कि जे, मच्छिमारी किंवां तत्सम व्यवसाय करतात. ते समुद्रास नारळ वाहतात. म्हणतात कि, साधरणतः मान्सून येण्याअगोदर व पावसानंतर दोन महिने समुद्र खवळलेला असतो व तो कालांतराने शांत होतो व हा शांत व्हावा, समुद्र प्रवास करताना त्रास होऊ नये म्हणून, श्रद्धेपोटी नारळ अर्पण करतात व प्रार्थना करतात कि, यानंतर तुझ्या उसाळनाऱ्या लाटा शांत कर. त्याचबरोबर या दिवशी बहिण भावाच्या पवित्र प्रेमाचा दिवस म्हणून ओळखला जाणारा दिवस म्हणजे राक्षांबंधनाचा सण...! या दिवशी बहीण भावाला राखी बांधते व भाऊ बहिणीच्या या रक्षाबंधनाच्या माध्यमातून तिच्यावर येणारे संकट निवारण्याची शपथ घेतो. अर्थात वेळोवेळी संरक्षणाची जबाबदारी घेतो. या पवित्र सणाला खूप ऐतिहासिक महत्व आहे.त्याचबरोबर या महिन्यात वरदूलक्ष्मि व्रतसुद्धा महिलावर्गाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात केल्या जाते. हे व्रत शुक्रवारी करतात. या दिवशी महिला महा-लक्ष्मी मातेच्या प्राप्तीसाठी उपवास करतात व महिलांना बोलावून योग्य भेटवस्तू देवून एकमेकीना सुख समृद्धीच्या व पुढील आयुष्यात आनंदप्राप्त होवो अशी मनोकामना करतात.

श्रावण महिन्यातील कृष्णपक्ष सप्तमीच्या मध्यरात्री जगाला प्रेम शिकवण देणारे, विष्णूचा आठवा अवतार भगवान श्रीकृष्ण याचं रोहिणी नक्षत्रावर वार बुधवारी मथुरेच्या कारागृहात जन्म झाला. त्यांनतर गोपाळकाला...! श्रावणातल्या अष्टमीला भगवान परमात्मा यांच्या जयंतीनिमित्त गोपाळकाला करतात. गोपाळ म्हणजे गायीचे पालन करणारा व काला म्हणजे एकत्र मिसळणे तर यामध्ये पोहे, ज्वारीच्या लाह्या ,धान्याच्या लाह्या, आंब्याचे लोणचे, दही, ताक, चण्याची भिजलेली डाळ, साखर वेगवेगळ्या फळाच्या फोडी असे एकत्र मिसळून एक खाद्यपदार्थ तयार करतात, असे म्हणतात कि भगवान श्रीकृष्ण यांना खूपच प्रिय होते. श्रीकृष्ण व त्यांचे सवंगडी मिळून यमुनेच्या तीरावर तयार करत व अतिशय आवडीने सगळे मिळून मिसळून खात असत. आज संपूर्ण भारतभरच नाही तर जगभरातील कृष्णप्रेमी असा गोपाळकाला करून खातात. तसेच सम्पूर्ण भारतामध्ये व जगामध्ये दहीहंडीचे नियोजन करतात व दहीहंडी फोडून हाच पदार्थ खातात. याच दिवशी एक महान विभूती कि ज्यांनी गीतेवर भाष्य करून, सर्वसाधारण जनतेस संस्कृत भाषा समजत नव्हती म्हणून प्राकृत मराठी भाषेत अगदी साध्या व सोप्या भाषेत गीताज्ञान दिले. व महानग्रंथ ज्ञानेश्वरी ची रचना केली. अशा या संत ज्ञानेश्वर महाराज यांचा जन्म तेराव्या शतकात आपेगाव, पैठण जि. संभाजीनगर येथे श्रावण कृष्णअष्टमी शके ११९७ (इ.स.१२७५) ला झाला. त्यांनी विश्वाच्या कल्याणासाठी परमेश्वराकडे पसायदानच्या माध्यमातूनमागणे मागितले कि, दुर्ष्टलोकांना सद्बुद्धी दे. याचबरोबर श्रावणातील शेवटचा सण म्हणून श्रावण कृष्णपक्ष तेराला दर्श पिठोरी अमावस्या या दिवशी बैलपोळा असतो. या दिवशी समस्त शेतकरी बांधव हे आपल्या शेतात राब राब राबणाऱ्या बैलाचे एखाद्या नववधुप्रमाणे लाड पुरवतात जणू...! त्याला अगोदरच्या दिवशी त्याच्या खांद्याला तेल, तूप हळद लावून मालिश करतात कारण तोच खांद्यावर त्या शेतकऱ्यांच्या शेतीचा भार उचलत असतो. त्याला ग्रामीण भाषेत खांद्यळणी किवा खांदामळणी असेही म्हणतात. पोळ्याच्या दिवशी शेतकरी त्याला सजवण्यासाठी सकाळपासून तयारीला लागलेला असतो त्याच्या शिंगाला रंग्-बेरंगी रंग मारतात. फुगे, फुलांच्या मालाही घालतात. त्याचप्रमाणे पाठीवर झूल चढवतात व साधारणपणे गावातल्या वेशीतून त्यांची मिरवणूक काढतात व गावातील मानकरी बैलाच्या व मालकासह आंब्याचे तोरण तोडून स्वतःच्या घरी घेवून जातात. गृहिणी प्रत्येक घरी पुरणपोळ्या बनवतात. बैलाला हळदी कुंकू लावून त्यांची पूजा करून औक्षण करतात. त्यांचासाठी हा दिवस मानापानाचा असतो. त्याला शेतीच्या कुठल्याच कामाला जुंपत नाही आणि हो...! हाच बैल भगवान शिव्-शंकर यांचे वाहन आहे त्यांना नंदि म्हणतात. म्हणून कि काय भगवान शिवशंकर हा नयनरम्य सोहळा बघून आनंदी होत असतील म्हणून, उपरोक्त उल्लेख केल्याप्रमाणे श्रावण महिन्यामध्ये शिवजीची पूजा करतात व शिवजी या महिन्यात पृथ्वीवर वास्तव्यास येतात. तर हेच कारण असावे, कारण या महिन्यातील वेगवेगळ्या सणांच्या माध्यमातून प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या भगवान शिव शंकराची पूजा केली जाते म्हणून भगवान शिवजींना हा महिना प्रिय आहे.

**श्री.विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ,जि.बुलढाणा**
**मो.नं.९७६३२८२०७७**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## उद्या साहित्य क्रांतीज्योत दिंडीचे वाटेगाव ते पुणे येथे आयोजन

**अक्षराज : दिलीप कांबळे**

**दि.२६, वाई (सातारा) :** आंतरराष्ट्रीय किर्तीचे थोर साहित्यिक लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न कधी देणार, या मागणीसाठी चला जाऊ वाटेगावला ज्योत पेटवू क्रांतीच्या साहित्याची दिंडी निघाली. पुरोगामी विचारांची महाराष्ट्र राज्य कामगार सुरक्षा दल झोपडपट्टी सुरक्षा दल व पथारी सुरक्षा दल या संघटनेच्या वतीने संस्थापक अध्यक्ष नेते भगवानराव वैराट यांच्या नेतृत्वाखाली साहित्य क्रांतीज्योती दिंडीचे वाटेगाव ते पुणे येथे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार, दिनांक २८ जुलै २०२५ रोजी सकाळी १० वाजता अण्णाभाऊ साठे जन्मभूमी वाटेगाव येथून ते सारसबाग पुणे येथे दिनांक ३१ जुलै २०२५ रोजी स्वागत होऊन अण्णाभाऊंना भारतरत्न साठी जोरदार शक्ती प्रदर्शन होणार आहे.

साहित्य क्रांतीज्योत दिंडी दिनांक २८ जुलै २०२५ रोजी वाटेगाव सकाळी १० वाजता सुरू होईल. रात्रीचा मुक्काम शासकीय विश्राम गृह कराड येथे होईल. दिनांक २९ जुलै २०२५ रोजी रात्रीचा मुक्काम सर्किट हाऊस सातारा येथे होईल. दिनांक ३० जुलै २०२५ रोजीच्या रात्रीचा मुक्काम शासकीय विश्राम गृह खंडाळा येथे होईल. दिनांक ३१ जुलै दुपारी १२ वाजता सारसबाग पुणे येथे ज्योत आगमन होऊन स्वागत समारंभ संपन्न होईल. या चार दिवस चालणाऱ्या साहित्य क्रांतीज्योत दिंडी वाटेगाव ते पुणे दिंडीत सामील होण्याचे आवाहन संयोजन समितीचे प्रमुख मोहम्मद शेख, शिवाजीराव भिसे, दत्ता डाडर, सुनिता जाधव, अभिजीत ननावरे, नितीन वने, दिलीप कांबळे, शिवाजी अवघडे, पंकज शिंदे, प्रवीण संकपाळ, संजय सकटे, सचिन वायदंडे, शरद केंगार, अरुण जाई, कर शाहीन जमादार संतोष फडतरे यांनी केले आहे.

## झाड पडून वाहनाचे झाले नुकसान



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२६, डोंबिवली (ठाणे) :** डोंबिवली एमआयडीसी निवासी, सुदर्शन नगर मधील ठ-५२ - ५३ भूखंडावरील इमारतीसमोर रस्त्यावर दिनांक २५ जुलै २०२५ रोजी दुपारी साडेतीन वाजता दरम्यान एक गुलम ोहराचे मोठे झाड अचानक कोसळून त्या झाडाखाली एक उभ्या असलेल्या कारचे नुकसान झाले. सुदैवाने कारमध्ये व तेथे आजूबाजूला कोणीही माणसे जात येत नसल्याने मनुष्य हानी झाली नाही. एमआयडीसी निवासी मध्ये प्रदूषणाचा प्रश्न गंभीर असल्याने नागरिकांनी तेथे पूर्वीपासून अनेक झाडे लावली आहेत. आता ती झाडे मोठी होवुन त्यांच्या फांद्यांचा मोठा पसारा झाला आहे. या फांद्या अस्ताव्यस्त वाढवल्याने पथदीव्याचा प्रकाश रस्त्यावर पडत नाही. तसेच या फांद्यांमुळे झाडांवर भार येवुन ती कोसळण्याची शक्यता असते. तसेच काही झाडे ही धोकादायक स्थितीत आहेत. ही धोकादायक झाडे व झाडांच्या अतिरिक्त फांद्या तोडण्यासाठी येथील रहिवाशांनी केडीएमसी यांच्याकडे तशा तक्रारी केल्या आहेत. त्यांनीही याबाबत काही प्रमाणात फांद्या/झाडे तोडुन कारवाई केली आहे. पण अशी बरीच झाडे असल्याने आणि सदर झाडांच्या फांद्या या वारंवार काही दिवसानी सतत वाढत असल्याने त्याची छाटणी नेहमी नियमित केली पाहिजे. परंतु ती होत नसल्याने अशी झाडे कोसळण्याचा संख्येत वाढ होताना दिसत आहे. त्यामुळे कधीतरी अशी झाडे पडून मनुष्य हानी होण्याची शक्यता आहे. कल्याण डोंबिवली महापालिकेच्या उद्यान विभागाने यावर नियमित फांद्या छाटणीची कार्यवाही करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## डिकसळ एस.टी कॉलनी, फरीद नगर, संभाजीनगर जलमय प्रशासनाचे दुर्लक्ष नागरिकांवर भारी



**अक्षराज : राजेश पुरी**

**दि.२६, कळंब (धाराशिव) :** डिकसळ (ता.कळंब) येथील एसटी कॉलनी, फरीद नगर, संभाजीनगर या भागांतील नागरिक सध्या पाण्याच्या वेढ्यात अडकले असून, अक्सा मस्जिद आणि मुख्य रस्त्यावर साचलेल्या पाण्यामुळे नागरिकांचे हाल सुरू आहेत. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे या रस्त्यावर तब्बल १२ फूट पर्यंत पाणी साचले आहे. यामुळे वाहतूक ठप्प झाली असून, पादचारी आणि लहान वाहनांची वाहतूक पूर्णतः थांबली आहे. रहिवाशांनी सांगितले की, दरवर्षी पावसाळ्यात हीच समस्या निर्माण होते, मात्र यंदा परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे. आमच्या मुलांना शाळेत पाठवणे, ज्येष्ठ नागरिकांना दवाखान्यात नेणे, किंवा किराणा आणणे अशक्य झाले आहे.

प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही आजपर्यंत कोणतीही ठोस कारवाई न झाल्यामुळे नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी आहे. डिकसळ ग्रामपंचायत कार्यालय आणि सरपंच झोपेत आहेत का? असा सवाल संतप्त नागरिकांनी उपस्थित केला आहे. या गंभीर समस्या कायमस्वरूपी सोडवाव्यात, रस्त्यावरील निचरा त्वरित व्हावा आणि येथील नागरिकांचे हाल थांबावेत, अशी जोरदार मागणी केली जात आहे. अन्यथा, प्रशासनाविरुद्ध तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा स्थानिकांनी दिला आहे.

## आ. श्रीजया चव्हाण यांनी केले गाढे परिवारांचे सांत्वन



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२६, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड येथील लोकमत चे पत्रकार संतोष पा गाढे यांचे वडील कै. जगन्नाथ पाटील गाढे यांचे दि.२४ जूलै रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. आमदार श्रीजया चव्हाण यांनी गाढे परिवार यांच्या मुदखेड निवासस्थानी भेट देऊन आई कमलबाई गाढे, बहीण, शिल्पाताई पाटील, शितलताई पाटील, भाऊ कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक संदीप पाटील गाढे, बाळू पाटील गाढे यांना धीर देऊन सांत्वन केले.

# पाटण येथे नव्याने बांधण्यात येत असलेल्या प्रशासकीय इमारतीला आताच गळती



**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२६, पाटण (सातारा) :** पाटण येथे नव्याने बांधण्यात येत असलेल्या व अनेक दिवस जनतेच्या प्रतिक्षेत असलेल्या प्रशासकीय इमारतीच्या स्लॅबला चालू पावसाळ्यात अनेक ठिकाणी गळती लागल्याने कामाच्या दर्जाबाबत प्रश्न चिन्ह उभे राहत असताना आश्चर्य व्यक्त होत आहे. इमारतीचे काम सुरू होऊन दोन वर्षे झाली नाहीत तर इमारतीची ही अवस्था असून इमारतीचा पुढील काळ कसा असेल हे सांगणे कठीण आहे.

या इमारतीचे बांधकाम बाहेरुन भक्कम दिसत असले तरी आतील बाजूची अवस्था बिकट आहे. ठिकठिकाणी स्लॅब गळत आहे. भिंतींना पाण्याचे पाझर फुटल्यामुळे भिंतींना केलेले प्लास्टर आणि वरुन मारलेली पुट्टी उध्वस्त झाले आहे. बांधकाम सुरू असलेल्या नवीन प्रशासकीय इमारतीची अशी अवस्था असताना अधिकारी वर्ग, लोकप्रतिनिधी केवळ दिखाऊपणा करण्यासाठी येथे येवून फोटोसेशन करून जातात मात्र कामाच्या निकृष्ट दर्जाबाबत ठेकेदार संबंधितांना जाब विचारतात का नाहीत याचे आश्चर्य लोकांच्यात आहे.

पाटण येथे नव्याने बांधण्यात येत असलेल्या प्रशासकीय इमारतीचा अंदाजीत खर्च २९ कोठी रुपये इतका आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात खर्च करुन बांधण्यात येत असलेल्या इमारतीचे बांधकाम उत्कृष्ट होतय की निकृष्ट होतय.. ? याकडे कोणाचे लक्ष जाईल याचे नवल आहे.

इमारतीचे बांधकाम चार मजल्याचे असून सध्या परिस्थितीत दोन मजल्यापर्यंत बांधकाम पूर्णत्वास गेले आहे.

आता पर्यंतचे झालेले बांधकाम उत्कृष्ट झाले असल्याचा दावा अनेकजण करत असले तरी चालू पावसाळ्यात पहिल्या मजल्याच्या आणि दुसऱ्या मजल्याच्या स्लॅबला आताच गळती लागली असल्याचे ठिकठिकाणी दिसत आहे. तर आतील भिंती ओल्या झाल्या आहेत. भिंतींना पाण्याचा पाझर फुटल्यामुळे केलेले प्लॅस्टर आणि पुटी उखडून पडल्याचे चित्र अनेक ठिकाणी दिसत आहे. यावरून तालुक्यातील जनतेच्या प्रतिक्षेत असलेल्या या प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाचा दर्जा सर्वांच्या नजरेसमोर येत आहे.

सद्या दुसऱ्या टप्प्यातील निधी अभावी प्रशासकीय इमारतीचे बांधकाम गेले वर्ष दिड वर्ष रखडले असून इमारत पूर्णत्वासाठी दिलेला १८ महिन्यांचा पहिल्या टप्प्यातील कालावधी मार्च २०२३ ला संपवुन २ वर्ष ४ महिने उलटले तरी या इमारतीचे बांधकाम सद्या अर्धवट अवस्थेत आहे. दुसऱ्या टप्प्यातील वाढीव निधी शासनस्तरावर प्रस्तावित आहे.

दुसऱ्या टप्प्यातील निधी तात्काळ उपलब्ध झाला तर इमारत पूर्ण होण्याचा कालावधी मार्च २०२६ पर्यंत केवळ ८ महिने शिल्लक राहिला आहे. पुढील ८ महिन्यांत इमारत पूर्ण होईल का नाही याची शंका तालुक्यातील सुज्ञ नागरिकांना लागली आहे.

### काम लवकर पूर्ण करावे...

जनतेला शासन सुविधा सुलभतेने तात्काळ मिळाव्यात. या हेतूने पाटण तालुक्यातील सर्व विभागांचे मुख्य कार्यालय एकाच छताखाली आणण्याचा प्रयत्न मंत्री शंभुराज देसाई यांचा असून यांच्याच प्रयत्नातून प्रशासकीय इमारतीचे नवीन बांधकामास गेल्या २ वर्षांपासून सुरुवात झाली आहे. सद्या हे काम निधीअभावी रखडले असून इमारत लवकर पूर्णत्वास येण्यासाठी मंत्री शंभुराज देसाई यांनी प्रयत्न करावेत. अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. सद्या नव्याने बांधकाम सुरू असलेल्या इमारतीमुळे येथील शासकीय कार्यालये पाचशे मीटर ते एक किलोमीटरच्या अंतरापर्यंत तात्पुरत्या स्वरूपात दुसऱ्या ठिकाणी गेली आहेत. याचा नाहक त्रास पाटण तालुक्यातील जनतेला होत आहे.

### आरएमसी प्रॉब्लेममुळे गळतीची समस्या - एक.एम.जाधव

प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाबाबत पाटण विभाग सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता एस.एम. जाधव यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी दुसऱ्या टप्प्यातील निधी अभावी इमारतीचे बांधकाम थांबले असून निधी उपलब्ध होताच इमारत लवकर पूर्ण करण्याचा आमचा प्रयत्न आहे. असे सांगतानाच ज्या ज्या ठिकाणी स्लॅब गळत आहे. त्या ठिकाणी नव्याने स्टेटमेंट करुन घेण्याच्या सूचना ठेकेदाराला देणार असल्याचे सांगितले तर गळतीची समस्या आरएमसी प्रॉब्लेममुळे होत असल्याचे त्यांनी सांगितले.

# दिव्यातील लाखो घरांना अंधारात लोटले जाणे ही प्रशासनाची अपयशाची कबुली - रोहिदास मुंडे




**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२६, दिवा (ठाणे) :** दिवा परिसरात गेल्या अनेक वर्षांपासून म ोठ्या प्रमाणावर नागरी वसाहती उभ्या राहत आहेत. हे सर्व प्रशासनाच्या डोळ्यासमोर घडले असून आज लाखो नागरिक तिथे वास्तव्यास आहेत. अशा परिस्थितीत जर ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त असे आदेश देत असतील की अनधिकृत घरांना वीज आणि पाणी जोडणी देऊ नका, तर हा निर्णय केवळ अन्यायकारकच नव्हे तर अमानवी देखील ठरतो. मूलभूत सेवा नाकारणे म्हणजे नागरिकांना मरणाच्या दारात ढकलणे


पाणी आणि वीज या सेवा भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१ अंतर्गत येणाऱ्या जीवनाच्या अधिकाराचा एक अविभाज्य भाग आहेत.

शासन व प्रशासन यांची जबाबदारी असते की नागरीकांना मूलभूत सुविधा पुरवाव्यात. जर एखादे बांधकाम अनधिकृत असेल, तर त्यावरील कारवाई वेगळी आहे, पण त्या घरात राहणाऱ्या कुटुंबांना पाणी व वीज न देणे म्हणजे त्यांच्यावर दुहेरी अन्याय आहे. दिवा परिसरात लाखो घरं उभी राहिली, तेव्हा प्रशासन कुठं होतं?

आज प्रश्न असा आहे की जर ही घरं अनधिकृत होती, तर त्या वेळी म हानगरपालिका व शासनाचे अधिकारी झोपी का गेले होते? आता नागरिकांनी आपले आयुष्य उभे केल्यानंतर त्यांना वीज आणि पाणीपासून वंचित ठेवणे ही केवळ लाजिरवाणी गोष्ट आहे. यासंदर्भात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे कल्याण ग्रामीण विधानसभा प्रमुख रोहिदास मुंडे यांनी म हापालिके कडे मागणी केली आहे की, दिवा परिसरातील सर्व घरांना त्वरित वीज व पाणीजोडणी द्यावी.

नागरिकांवर अन्याय करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. अनधिकृत बांधकामांचे मूळ दोषी भ्रष्ट अधिकारी यांच्यावर गुन्हे दाखल करावेत. दिवा क्षेत्रासाठी विशेष नागरी सुधारणा प्रकल्प हाती घ्यावा. जनतेवर अन्याय करणाऱ्या धोरणांना आता आम्ही कंटाळलो आहोत. जर प्रशासनाने निर्णय मागे घेतला नाही, तर आम्ही मोठ्या प्रमाणावर रस्त्यावर उतरण्याचा इशारा रोहिदास मुंडे यांनी दिला आहे. जनतेच्या मुलभूत हक्कांसाठी आम्ही लढू आणि मागण्या पूर्ण होईपर्यंत शांत बसणार नाही. असा इशारा रोहिदास मुंडे यांनी दिला आहे.

# पर्यटनातून रोजगारनिर्मितीला प्रथम प्राधान्य ! लवकरच पर्यटनस्थळांचा एकत्रित प्रारूप आराखडा



**अक्षराज : विश्वास नायगांवकर**

**दि.२६, तुळजापूर (धाराशिव) :** धाराशिव जिल्ह्याला ऐतिहासिक, भौगोलिक आणि प्राचीन पर्यटनस्थळांचा वैभवशाली वारसा लाभला आहे. महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी देवीचे शक्तिपीठ आणि संतश्रेष्ठ गोरोबाकाका यांच्या भक्तिपीठाचे त्याला मोठे आशीर्वाद लाभलेले आहेत. पर्यटन विकासाच्या माध्यमातून आपण रोजगार निर्मितीला प्रथम प्राधान्य देत आहोत. त्यासाठी जिल्ह्यातील सर्व पर्यटन स्थळांचा एकत्रित प्रारूप आराखडा २० ऑगस्ट पर्यंत पूर्ण करण्याचे निश्चित करण्यात आले असल्याचे 'मित्र' चे उपाध्यक्ष आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे.

धाराशिव जिल्ह्यातील पर्यटन विकासाच्या माध्यमातून रोजगार निर्मिती व आर्थिक सबलीकरणाच्या हेतूने नळदुर्ग, येडशी, तेर व येरमाळा आदी पर्यटन स्थळांचा एकात्मिक विकास करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. 'मित्र' संस्थेच्या माध्यमातून राज्याच्या उत्पन्न वृद्धीवर भर देत असतानाच धाराशिव जिल्ह्यातील दरडोई उत्पन्न वाढविण्यावर नियोजनबद्ध काम सुरू आहे. त्याचाच एक महत्वाचा भाग म्हणून जिल्ह्यातील पर्यटनस्थळे विकसित करण्यासाठी युद्धपातळीवर काम हाती घेण्यात आले आहेत. या अनुषंगाने पर्यटन विभागाच्या अधिकाऱ्यांसह जिल्हा प्रशासनातील प्रमुख अधिकाऱ्यांसमवेत नुकतीच बैठक घेण्यात आली. या बैठकीत अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. त्यानुसार जिल्ह्यातील या चार पर्यटन स्थळांचा प्रारुप एकात्मिक विकास आराखडा २० ऑगस्ट २०२५ पर्यंत करण्याचे ठरले आहे. या बैठकीस तुळजाभवानी मंदिर संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रकाश अहिरराव, निवासी उपजिल्हाधिकारी श्रीमती. शोभा जाधव, तहसीलदार अरविंद बोळंगे, तहसीलदार अभिजित जगताप, पर्यटन विभागाच्या श्रीमती जया वहाने, सल्लागार श्रीमती नेहा शितोळे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

नळदुर्ग येथील किल्ला व सभोवतालच्या नैसर्गिक संपत्तीचा योग्य वापर करत विकास साधला जाणार आहे. तसेच बसवसृष्टी व वसंतराव नाईक स्मारकासह इतर बाबींचा विचार करून 'रोप-वे', ' हॉट एअर बलून' यासारख्या साहसी क्रीडा प्रकारांचा देखील या आराखड्यात समावेश करण्यात येणार आहे. येडशी येथील रामलिंग अभयारण्यासह श्री क्षेत्र रामलिंग मंदिर व परिसराचा विकास, तसेच केंद्रीय रेल्वे मंत्रालयाच्या अखत्यारीत असलेला दुर्गादेवी डाक बंगला, जुनी रेल्वेलाईन व स्टेशन तथा जुने विठ्ठलवाडी गाव मूळ ऐतिहासिक रूपात पुन्हा एकदा नव्याने साकारण्यात येणार आहे.

महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी देवीची धाकटी बहीण म्हणून ख्याती असलेल्या श्री क्षेत्र आई येडेश्वरी देवीमंदिर परिसरात आवश्यक भूसंपादनासह एकात्मिक विकास आराखडा तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. प्राचीन 'तगर'चा इतिहासाला असलेली वैभवशाली प्राचीन झळाळी पुन्हा एकदा यानिमित्ताने मिळणार आहे. राज्यातील सर्वात प्राचीन मंदिर असलेल्या त्रिविक्रम मंदिराच्या जीर्णोद्धाराचे काम जवळपास अंतिम टप्प्यात आहे. या सगळ्या विकास कामांसह तेर गावाचादेखील स्वतंत्र विकास आराखडा तयार केला जात आहे. त्यातून जिल्ह्यातील पर्यटन व्यवसायाला मोठी चालना मिळून त्यातून स्थानिक रोजगार निर्मिती वाढेल, असा विश्वासही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे.

# राष्ट्रीय एड्स नियंत्रण अभियान अंतर्गत रेड रन मॅराथॉन, प्रश्न मंजुषा स्पर्धेचे आयोजन

## युवकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२५, चंद्रपूर :** राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत एच.आय.व्ही./एड्स संदर्भात जनजागृतीचे उपक्रम राबविण्यासाठी आरोग्य प्रशासनामार्फत विस्तृत रूपरेषा आखण्यात आलेली आहे. या वर्षी देखील जिल्ह्यात जनजागृतीच्या उद्देशाने विविध कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. त्या निमित्ताने जिल्हा एड्स नियंत्रण कक्ष, सामान्य रुग्णालयाद्वारे जिल्हाभरात आयसीटीसी व अनुदानित स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

२८ जुलै रोजी जिल्ह्यातील माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी प्रश्न मंजुषा स्पर्धेचे आयोजन दुपारी १२ वाजता भवानजीभाई चव्हाण हायस्कूल, मूल रोड, चंद्रपूर येथे करण्यात आले असून या स्पर्धेत जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा, तसेच २९ जुलै ला एड्स मुक्त समाज होण्यासाठी समाजाचा सहभाग मिळावा, यासाठी रेड रन (मॅराथॉन) स्पर्धेचे आयोजन जिल्हा एड्स नियंत्रण कक्षाकडून करण्यात आले आहे. सदर मॅरेथॉन बॅडमिंटन हॉल, जिल्हा स्टेडियम, चंद्रपूर येथून सकाळी ७ वाजता सुरू होईल. यामध्ये देखील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.महादेव चिंचोळे व जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश पुंड यांनी केले आहे. तालुकास्तरावर असलेल्या आयसीटीसी केंद्र व स्वयंसेवी संस्था यांच्या माध्यमातून जिल्हाभरात विविध जनजागृती पर स्पर्धा, पथनाट्य, आरोग्य तपासणी शिबिरे, विविध गटासोबत संवेदीकरण कार्यशाळा वर्षभराच्या कालावधीत आयोजीत करण्यात आलेल्या आहे. तसेच सर्व तालुक्यामध्ये एच.आय.व्ही. बाधितांना विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यासाठी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हा एड्स नियंत्रण कक्षाद्वारे ऑनलाईन जनजागृती स्पर्धा घेण्यात येत असून यामध्ये जास्तीत जास्त संख्येने युवा पिढीने भाग घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

प्रत्येक तालुक्यात व ग्रामपंचायत स्तरावर एकात्मिक सल्ला व तपासणी केंद्र व महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थे अंतर्गत कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्था, संकल्प बहुउद्देशीय ग्राम विकास संस्था, लिंक वर्कर प्रकल्प व मायग्रंट प्रकल्प, नोबल शिक्षण संस्था, ट्रकर्स व मायग्रंट प्रकल्प, संबोधन ट्रस्ट-कोअर प्रकल्प, क्राईस्ट हॉस्पिटल- विहान प्रकल्प या संस्थाद्वारे मोठ्या प्रमाणात जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष येथील जिल्हा कार्यक्रम अधिकारी सुमंत पानगंटीवार यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाभरात विविध उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात येत असून या सर्व कार्यक्रमांमध्ये जास्तीत जास्त संख्येने नागरिकांनी, युवकांनी सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

# रांजणगाव येथे जादूच्या प्रयोग कार्यक्रमाचे आयोजन

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.२६, सुपा (अहिल्यानगर) :** रांजणगाव येथील श्री रंगदासस्वामी शिक्षण विकास मंडळ, आणे संचलित श्री शिवाजी माध्य.व उच्च माध्य.विद्यालय येथे महाराष्ट्र नवनिर्माण माथाडी कामगार सेनेचे राज्य उपचिटणीस मंगेशभैय्या शिंदे पाटील यांच्या तर्फे गावांतील सर्व शाळांसाठी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध जादूगार प्रकाश शिराळे यांच्या जादूचे प्रयोग कार्यक्रमाचे व गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र नवनिर्माण माथाडी कामगार सेनेचे राज्य उपाध्यक्ष अविनाश पवार यांच्या शुभहस्ते पार पडले.

याप्रसंगी गावातील शिंदे मळा धाडगेवाडी व हगेश्वर वस्तीवरील सर्व शिक्षक व विद्यार्थी सहभागी होते. कार्यक्रमाचे उद्घाटक मनसे नेते अविनाश पवार यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोन वाढविण्यासाठी विविध कार्यक्रम आयोजित करण्याचा विश्वास व्यक्त केला. तसेच सर्व शिक्षकांना गुलाब पुष्प देऊन सन्मानित करण्यात आले कार्यक्रमाचे आयोजक मंगेशभैय्या शिंदे पाटील यांनी जादूचे प्रयोग मनोरंजनातून शिक्षणाकडे जाण्याचा अप्रतिम मार्ग आहे असे मत व्यक्त केले.

त्याचबरोबर विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच अष्टपैलू व्यक्तिमत्त्व बनविण्यासाठी भक्कम व्यासपीठ सदैव उपलब्ध करू असा विश्वास व्यक्त केला. यावेळी राजंणगाव मधील सर्व शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता पुर्ण यशाबद्दल सायली साबळे, वैभवी शिंदे, श्रावणी उदार, समृद्धी गायकवाड, सिद्धी शिंदे, राहुल मेहेत्रे, कु.ओम गाढवे, कु.प्रियंका गाढवे, प्रांजल वाघ, काव्या शिंदे, दिव्या जवक, समृद्धी तागड, गौरी शेटे, पूनम सरोदे यांचा व उंच क्रीडा प्रकारात मिळविलेल्या यशाबद्दल कु. कादंबरी साबळे व गौरी शेटे यांच्या सह विद्यार्थिनींचा मान्यवरांच्या उपस्थित सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.

सुप्रसिद्ध जादूगार प्रकाश शिराळे यांनी जादूचे प्रयोग दाखवत सर्वांना मंत्रमुग्ध केले. विज्ञान, संमोहन, हातचलाखी यांचा अप्रतिम संगम असणारे प्रयोग दाखवत कार्यक्रमाची उंची वाढवली अंधश्रद्धा निर्मूलन, मुली वाचवा, मुली जगवा असा सामजिक संदेश देत सामाजिक भान जपले. कार्यक्रमाचे संयोजक



अरुण वाळुंज यांनी कार्यक्रमाचे आयोजक मनसे नेते मंगेशभैय्या शिंदे पाटील यांनी केलेल्या अप्रतिम आयोजनाबद्दल व सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले. याप्रसंगी मनसे तालुका सचिव नारायण नरोडे, मनसे सुपा शहर अध्यक्ष अक्षय सुर्यवंशी, यासह मनसेचे विविध पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते किशोर जाधव, अतिष सूर्यवंशी, तुषार बोरगे, शैलेश हटाळे, रुपेश हटाळे यासह रांजणगाव मधील सर्व शिक्षकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यालयाचे मुख्याध्यापक विकास बनकर तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक यांनी सर्व शाळा एकत्रित करून कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल आयोजकांचे आभार मानले.

# गावठी कट्टा व काडतूसांसह दोघांना अटक!

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२६, विंचूर (नाशिक) :** लासलगाव व येवला पोलिसांनी संयुक्त धाडशी कार्यवाही करत गावठी कट्टा आणि ३ जिवंत काडतूसांसह दोन संशयितांना अटक केली असून, त्यांच्या ताब्यातून एक मोबाईलसह एकूण ३५ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दि.२४ जुलै २०२५ रोजी रात्री १०.२२ वाजता पाटोदा ता.येवला परिसरात ऋषिकेश मोतीराम माळी, वय २४, रा.आंबेगाव ता.येवला आणि सोपान निवृत्ती जगताप, वय ३२, रा.मरळगोई ता. निफाड हे दोघे गावठी कट्टा बाळगून फिरत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी तत्काळ त्या दिशेने हालचाल केली. संशयितांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता, त्यांच्याकडे स्टील बॉडी असलेला



**लासलगाव व येवला पोलिसांची संयुक्त कार्यवाही**

चॉकलेटी प्लॅस्टीक हँडलचा गावठी कट्टा, ३ जिवंत काडतुसे व एक रेडमी कंपनीचा मोबाईल आढळून आला. या सर्व मुद्देमालाची एकूण किंमत ३५,९०० रुपये इतकी असून, पोलिसांनी सर्व सामग्री जप्त केली आहे. अटक करण्यात आलेल्या सोपान जगताप याच्यावर यापूर्वीही गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. त्याच्यावर आडगाव पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा, जळगाव शहर पोलीस ठाण्यात आर्म अॅक्ट अंतर्गत गुन्हा तर लासलगाव पोलीस ठाण्यात दरोडा, गैरप्रवेश, धमकी व नुकसान यासंदर्भातील गंभीर गुन्हे दाखल आहेत. ही संपूर्ण कारवाई नाशिक ग्रामीणचे पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांच्या सूचनेनुसार, अपर पोलीस अधीक्षक तेगबीरसिंह संधू, उपविभागीय पोलीस अधिकारी बाजीराव महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. येवला पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी संदीप मंडलिक, लासलगाव पोलीस ठाण्याचे स.पो.नि भास्करराव शिंदे, पोलीस उपनिरीक्षक हर्षवर्धन बहीर, पोलीस शिपाई सुजय बारगळ आणि संदीप डगळे, पोलीस नाईक सचिन वैरागर, पोलीस शिपाई सागर बनकर, पंकज शिंदे, दिपक जगताप, चालक राजु दुबे आदींच्या पथकाने पेट्रोलिंग दरम्यान ही उल्लेखनीय कारवाई केली.

# मेंढेघर येथे विजेच्या धक्क्याने शेतकऱ्याचा मृत्यू

**खरे पाहता कोयना विभागातील पावसाची व वाऱ्याची तीव्रता लक्षात घेता पावसाळ्यापूर्वी गंजलेले पोल बदलून विद्युत वाहक तारांची दुरुस्ती होणे गरजेचे आहे. मात्र महावितरण कंपनीचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचा आरोप भाजपा पाटण तालुका पश्चिम अध्यक्ष नंदकुमार सुर्वे यांनी केला आहे.**

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२५, पाटण (सातारा) :** मेंढेघर (कदमवाडी), ता.पाटण येथे दिनांक २४ जुलै २०२५ रोजी वादळी वाऱ्यामुळे जमिनीवर तुटून पडलेल्या वीज वाहक तारेला स्पर्श झाल्याने शेतकरी मोहन अंबाजी कदम (वय ४५) यांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली. दरम्यान, यावेळी ग्रामस्थांच्या मागणीनुसार सदर कुटुंबास तातडीची आर्थिक मदत दिल्यानंतर मोहन कदम यांचा मृत्यदेह शवविच्छेदनास पाठविण्यात आला.याबाबत स्थानिक नागरिकांनी दिलेली माहिती अशी, कोयना विभागातील मेंढेघर (कदम वाडी) येथील शेतकरी मोहन अंबाजी कदम हे दिनांक २४ जुलै २०२५ रोजी सकाळच्या सुमारास जनावरे चारावयास गेले होते. सायंकाळी जनावरे घरी परतली. मात्र मोहन कदम हे घरी परत न आल्याने कुटुंबियांनी त्यांची शोधाशोध केली. त्यावेळी शेताच्या माळरानावर त्यांचा मृतदेह आढळून आला. त्याचठिकाणी शेजारी वीज वाहक तार तुटून जमिनीवर पडली होती. या तारेला स्पर्श झाल्यानेच त्यांचा मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. दरम्यान, वीज वितरण कंपनीच्या गलथान कारभारामुळेच हा प्रकार घडला आहे. त्यामुळे वीज वितरण कंपनीने सदर कुटुंब गरीब असल्याने त्या कुटुंबास आर्थिक मदत द्यावी. अन्यथा मृतदेह हलवणार नाही असा इशारा देत मागणी लावून धरली. तद्नंतर वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी मयत व्यक्तीच्या कुटुंबियांना तातडीची २० हजार रुपयांची मदत दिली. तसेच उर्वरीत मदत पंचनामा करून मृत्यूचा अहवाल सादर झाल्यावर देण्यात येईल असे लेखी पत्र दिल्यानंतर मृतदेह पाटण येथे शवविच्छेदन करण्यासाठी पाठविण्यात आला. रात्री उशिरा शवविच्छेदन केल्यानंतर मेंढेघर येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. दरम्यान, कोयना विभागात अनेक ठिकाणी गंजलेले विद्युत पोल धोकादायक परिस्थितीत उभे आहेत. काही ठिकाणी विद्युत वाहक तारा खराब झाल्या असून त्या लोंबकळत आहेत. याची वारंवार तक्रार करूनही महावितरण कंपनी त्याकडे दुर्लक्ष करत असून या कामांना निधी उपलब्ध नाही असे कारण पुढे केले जात आहे, असल्याचे स्थानिक ग्रामस्थांनी सांगितले.

# थोडक्यात

## पाटण नगरपंचायत मालकीची जागा पूर्वत करून देण्याची भूमिअभिलेख कार्यालयाकडे मागणी

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२६, पाटण (सातारा) :** पाटण नगरपंचायत मालकीची असणारी सार्वजनिक मिळकत चुकीची कागदपत्रे दाखल करून भूमिअभिलेख कार्यालयात केलेली चुकीची नोंद रद्द करून ती पर्ववत करून मिळावी, अशी मागणी पाटण शहरातील प्रभाग क्र. १४ मधील ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी सातारा यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात म्हटले आहे, पाटण नगरपंचायत मालकीची असणारी सार्वजनिक मिळत असून त्याचा गट क्र. ११४७ आहे. पूर्वी याची नोंद सार्वजनिक श्री मारुती मंदिर देवालय रामापूर पाटण अशी होती. या सार्वजनिक मंदिराचे मासिक लाईट बील व देखभाल दुरूस्ती देखील पाटण नगरपंचायत मार्फत केली जाते. सदर मिळकती वर २०१४ मध्ये ग्रामपंचायत असताना त्या मिळकतीवर माजी सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्या डोंगरी विकास फंडातून ७ लाख रुपये मंजूर होवून त्या मिळकतीवर सभामंडपाचे काम देखील करण्यात आले होते. तर २०२१-२०२२ मध्ये प्रभाग १४ मध्ये मारुती मंदिर सार्वजनिक सभागृह परिसराचे सुशोभीकरण करण्याचे काम करण्यात आले. या मिळकतीत २०२२-२०२३ मध्ये देखील सभा मंडपासाठी २० लाखाचा निधी खर्च करण्यात आला आहे. असे असताना कोणतीही चौकशी करता आणि धर्मादाय संस्थेकडे खोटी कागदपत्रे सादर करून पाटण नगरपंचायत मालकीच्या असणाऱ्या सार्वजनिक मिळकतीवर श्री मारुती देवालय रामापूर पाटण हे नाव कमी करून वयक्तिक नावे टाकण्यात आली आहेत. ही चुकीची नोंद रद्द करण्यात यावी, अशी मागणी जिल्हाधिकारी सातारा यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनावर पाटण शहरातील प्रभाग १४ मधील श्रीकांत टोळे, शिवम कवर, राहुल टोळे, प्रकाश गजरे यांच्यासह शेकडो नागरिकांच्या सह्या आहेत.

## अंमली पदार्थाची तस्करी व विक्री करताना एकास अटक; बल्लारपूर पोलिसांची कारवाई



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२५, बल्लारपूर (चंद्रपूर) :** पोलीस ठाणे बल्लारपूर यांची उल्लेखनिय कामगीरी अशी आहे की, दिनांक २५ जुलै २०२५ रोजी सपोनि मदन दिवटे पोलीस ठाणे बल्लारपूर येथे कर्तव्यावर हजर असतांना खात्रीशीर बातमीदाराकडून माहीती मिळाली की, सुभाष वार्ड बल्लारपूर येथील राहणारा इसम नामे अरबाज खान हा आपले राहते घरी अवैधरित्या अंमली पदार्थ गांजा विक्रीकरीता बाळगुन आहे. अशी माहिती मिळाल्यावरून सदर मिळालेली माहीती पोनि विपीन इंगळे यांना देवून त्यांचे मार्गदर्शनात तसेच पोलीस अधिक्षक, चंद्रपुर व उपविभागीय पोलीस अधिकारी, राजुरा, यांचे परवानगीने मुखबीरने सांगितलेल्या वर्णनाप्रमाणे अरबाज शफी खान रा.प्रजापती चौक, सुभाष वार्ड, बल्लारपुर याचे घरी रेड करून झडती घेतली असता कि.अं.२७,२०४/- रू. एका पारदर्शक प्लास्टिक पिशवीमध्ये ओलसर गर्द हिरव्या रंगाचा पाने, फुले व बिया संलग्न असलेले कॅनबिस वनस्पती अंमली पदार्थ (गांजा) निव्वळ (गांजा) वजन- २.२६७ कि.ग्रॅम इतके मिळून आल्याने त्यांचेवर गुंगीकारक औषधी द्रव्य व मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम सन-१९८५ चे कलम-८ (क), २० (ब), ळळ (ब) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असुन सदर आरोपीस अटक करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधिक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पो. अधिक्षक ईश्वर कातकडे, सुधाकर यादव, उपविभागिय पो अधिकारी, राजुरा/चंद्रपुर यांचे मार्गदर्शनात पो. निरिक्षक बिपीन इंगळे, सपोनि मदन दिवटे, सपोनि शब्बीर पठाण, सफौ. रणविजय ठाकुर, आनंद परचाके, पोहवा. सत्यवान कोटनाके, संतोष दंडेवार, संतोष पंडीत, सुनील कामतकर, पो.अंमलदार शरदचंद्र कारूष, मिलिंद आत्राम, खंडेराव माने, लखन चव्हाण, विकास जुमनाके सचिन अलेवार, भास्कर चिचवलकर, सचिन राठोड, म.पो.अंमलदार अनिता नायडू तसेच चालक ग्रेड पोउपनि भास्कर कुंदावार इत्यादी पो. स्टाफ यांनी अतिशय कुशलतेने केली असून पुढील तपास पोउपनि अभिषेक जनगंमवार हे करीत आहेत.

## ग्रामीण कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत अहिरे, सुखेड शाळेत क्रीडा स्पर्धांचे आयोजन



**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.२६, खंडाळा (सातारा) :** ग्रामीण उद्यानविद्या कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत श्रीमंत शिवाजीराजे उद्यानविद्या महाविद्यालय,फलटणच्या सातव्या सत्रातील विद्यार्थ्यांनी नुकतेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, अहिरे आणि सुखेड ता.खंडाळा येथे क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांसाठी धावणे, कबड्डी आणि रस्सी खेच तसेच संगीत खुडची या पारंपरिक खेळांच्या स्पर्धा उत्साहात पार पडल्या. विद्यार्थ्यांनी या सर्व स्पर्धांमध्ये मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला आणि आपली कला व खेळातील कौशल्य दाखवले.

या उपक्रमात अहिरे शाळेचे मुख्याध्यापक, सुखेड शाळेचे मुख्याध्यापक सोळसकर, शिक्षक - खुडे, रास्कर, खंडागळे यांनी कार्यक्रमासाठी मार्गदर्शन केले. त्यांच्या सक्रिय सहभागामुळे कार्यक्रम अधिक प्रभावीपणे राबवता आला. स्पर्धांमधील विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढण्यास मदत झाली.या कार्यक्रमासाठी फलटण एज्युकेशन सोसायटी संचलित श्रीमंत शिवाजीराजे उद्यानविद्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी निंबाळकर, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.यु.डी.चव्हाण, कार्यक्रम अधिकारी डॉ. जे. व्ही. लेंभे, प्रा.डॉ.ए.के. अभंगराव तसेच कार्यक्रम समन्वयक प्रा.ए. डी.पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाची संपूर्ण जबाबदारी उद्यान दूत रोहन दंडे, सुमित आल्हाट, प्रज्वल दारफळे, शिवम शेंडगे, विश्वजित तोरडमल, विनायक पवार, संकेत बरडोल, रिषभ काळे, क्षितिज जंगम, उत्कर्ष कदम यांनी यशस्वीपणे पार पाडली.